मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चिखली-आकुर्डी रस्त्यासाठी नागरिक प्रतीक्षेत

## 30 ऐवजी 24 मीटरच्या प्रस्तावावर शासनाच्या निर्णयाकडे लक्ष



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली-आकुर्डी मार्गावरील साने चौक ते चिखली गाव या दरम्यानच्या रस्ते विकासाचा प्रश्न गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित असून, यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. विकास आराखड्यानुसार (DP PLAN) हा रस्ता ३० मीटर रुंदीचा मंजूर असला, तरी प्रत्यक्षात स्थानिक रहिवासी आणि व्यापाऱ्यांच्या जागा बाधित होत असल्याने या रस्त्याची रुंदी २४ मीटर ठेवावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

या संदर्भातील सुधारित प्रस्ताव महापालिकेमार्फत महाराष्ट्र शासनाकडे पाठवण्यात आला आहे, मात्र अद्याप त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही. जोपर्यंत शासनाकडून हिरवा कंदील मिळत नाही, तोपर्यंत कामाची गती मंदावलेली आहे.

गेल्या वर्षी या भागात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण विरोधी मोहीम राबवण्यात आली होती. या कारवाईला आता वर्ष पूर्ण होत आले आहे, मात्र रस्त्याचे काम अद्याप कागदावरच आहे. सद्यस्थितीत रस्ता अत्यंत अरुंद असून त्या ठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. अपुऱ्या सोयीसुविधांमुळे परिसरात धुळीचे साम्राज्य पसरले असून प्रदूषणात वाढ झाली आहे, ज्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. महापालिकेच्या आगामी बजेटमध्ये या रस्त्यासाठी निधीची तरतूद झाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे. प्रशासनाच्या सूत्रांनुसार, सध्या जेवढी जागा महापालिकेच्या ताब्यात आली आहे, तेवढ्या जागेवर प्राथमिक स्वरूपात रस्ता पूर्ण करण्याचा मानस आहे. मात्र, जोपर्यंत पूर्ण क्षमतेने काम सुरू होत नाही, तोपर्यंत ही कोंडी फुटण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे शासनाने तातडीने २४ मीटरच्या प्रस्तावावर निर्णय देऊन या कामाला गती द्यावी, अशी मागणी चिखलीतील संतप्त नागरिकांकडून करण्यात येत आहे.

> **रस्त्याच्या कामात बाधित झालेल्या शेतकरी आणि नागरिकांना प्रथम मोबदला मिळालाच पाहिजे. प्रशासनाने ताबा असलेल्या जागेत काम तातडीने सुरू करावे आणि उर्वरित काम नवीन निविदेद्वारे ६ महिन्यांत पूर्ण करावे. जर ६ महिन्यांच्या आत काम मार्गी लागले नाही, तर जनतेला सोबत घेऊन तीव्र जनआंदोलन छेडले जाईल.**
>
> **- संगीता ताम्हाणे, नगरसेविका**

> **"नवीन अर्थसंकल्पामध्ये या रस्त्याच्या निधीची तरतूद केली जाईल. अंदाजे मार्च महिन्यानंतर हे काम सुरू होईल. २४ मीटर की ३० मीटर या वादामुळे काम लांबणीवर जाऊ न देता संपादन झालेल्या जागेवर कामाला गती दिली जाईल."**
>
> **- मकरंद निकम, शहर अभियंता**

# देश, राज्य आणि पिंपरी-चिंचवडला आर्थिक बळ देणारा अर्थसंकल्प

## शिवसेना जिल्हा संघटक मा. संतोष सौंदणकर यांची प्रतिक्रिया



**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ हा विकसित भारताच्या दिशेने ठोस पावले टाकणारा, संतुलित आणि भविष्योन्मुख अर्थसंकल्प आहे. विकास, समावेशकता आणि संधींची समान वाटणी या तत्त्वांवर आधारित हा अर्थसंकल्प देशातील सर्व घटकांना बळ देणारा आहे. पायाभूत सुविधा, शहरी विकास आणि वाहतूक क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या मोठ्या तरतुदींमुळे महाराष्ट्रासह देशाच्या आर्थिक वाढीस गती मिळणार आहे, अशी प्रतिक्रिया शिवसेना जिल्हा संघटक मा. संतोष सौंदणकर यांनी व्यक्त केली आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी आज रविवारी (दि. १) केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. त्यावर प्रतिक्रिया देताना मा. सौंदणकर म्हणाले, या अर्थसंकल्पातून राज्यातील शेती, पशुपालन व मत्स्यव्यवसायासाठीच्या योजनांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी ऊर्जा मिळेल, तर महिला-केंद्रित उपक्रमांमुळे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाला चालना मिळणार आहे. डिजिटल अर्थव्यवस्था, डेटा सेंटर्स, AI आणि नव्या तंत्रज्ञान क्षेत्रातील निर्णय भारताला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवतील. आरोग्य क्षेत्रातील सवलती सामान्य नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार आहेत. एकूणच, हा अर्थसंकल्प रोजगारनिर्मिती, गुंतवणूक आणि सामाजिक सुरक्षिततेचा मजबूत पाया घालणारा असून देशाला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याची क्षमता त्यात आहे.

पिंपरी-चिंचवडसारख्या वेगाने वाढणाऱ्या शहरांसाठी नियोजनबद्ध गुंतवणूक, कौशल्याधारित शिक्षण आणि रोजगाराभिमुख धोरणे ही काळाची गरज होती. अर्थसंकल्पातील तरतुदींमुळे स्थानिक तरुणांना शिक्षण, उद्योग आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. आधुनिक पायाभूत सुविधा, सुलभ कर्जव्यवस्था आणि सामाजिक न्यायावर आधारित योजनांमुळे शहराचा विकास अधिक समतोल व शाश्वत होईल. एकूणच, हा अर्थसंकल्प पिंपरी-चिंचवडला औद्योगिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीच्या नव्या उंचीवर नेणारा ठरणार आहे, असेही, मा. सौंदणकर यांनी म्हटले आहे.

# केंद्रीय अर्थसंकल्प 2026–27 महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारा : आमदार शंकर जगताप

## “मुंबई–पुणे हायस्पीड कॉरिडॉर पुणे जिल्ह्याच्या औद्योगिक गुंतवणुकीची मोठी संधी”



**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६–२७ हा विकसित भारताकडे नेणारा दमदार आणि दूरदृष्टीचा विकसित भारताचा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया आमदार शंकर जगताप यांनी दिली आहे. या अर्थसंकल्पामुळे महाराष्ट्रासह देशाच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मलाजी सीतारामन यांनी आज देशाचा अर्थसंकल्प सादर केला. विकास, लोकांच्या वाढत्या आकांक्षा आणि ‘सबका साथ, सबका विकास’ या तीन सूत्रांवर आधारित हा अर्थसंकल्प आहे असे आमदार शंकर जगताप म्हणाले.

आमदार जगताप पुढे म्हणाले की, मुंबई–पुणे हायस्पीड कॉरिडॉर, पायाभूत सुविधा आणि शहरी विकासासाठी करण्यात आलेल्या तरतुदीमुळे महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीला वेग मिळणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात सरकारी भांडवली खर्च १२.२ लाख कोटी रुपयांपर्यंत ठेवण्यात आली आहे. पायाभूत सुविधांवर वाढविण्यात आलेल्या गुंतवणुकीकडे लक्ष वेधत ते म्हणाले, “आजच्या गुंतवणुकीवरून सरकारचा विकासावर असलेला ठाम विश्वास स्पष्ट होतो.” “महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक शहरीकरण झालेले राज्य आहे. ५ लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या मोठी असल्याने, शहरी पायाभूत सुविधा, वाहतूक, गृहनिर्माण आणि रोजगारनिर्मितीला मोठी संधी निर्माण होणार आहे,” असे त्यांनी नमूद केले.

या अर्थसंकल्पात शेती, पशुपालन आणि मत्स्यव्यवसायाला चालना देण्यात आली असून शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला. तसेच महिला नेतृत्वाखालील उद्योगांना प्रोत्साहन, प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी हॉस्टेल उभारण्याचा निर्णय आणि महिला-शेतकऱ्यांसाठी भरीव तरतूद ही सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची पावले असल्याचे त्यांनी सांगितले.

डिजिटल अर्थव्यवस्थेबाबत बोलताना आमदार शंकर जगताप म्हणाले की, डेटा सेंटर उभारणाऱ्या कंपन्यांना २०४७ पर्यंत करसवलत देण्याचा निर्णय हा भारताला डिजिटल हब बनवण्याच्या दिशेने निर्णायक ठरेल. यामुळे परदेशी गुंतवणूक वाढेल, क्लाऊड, AI आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल.

सीमाशुल्कात सवलत देत १७ कर्करोगविरोधी औषधे आणि ७ इतर दुर्मिळ आजारांच्या औषधांना मूलभूत सीमाशुल्कातून सूट देण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. ‘लखपती दिदी’ योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी निर्माण करण्याची योजना अर्थसंकल्पातील एक महत्त्वाची बाब असून, प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना देखील तयार करण्यात आली आहे. रोजगारनिर्मिती, आरोग्य सेवा, गुंतवणूक आणि इन्फ्रास्ट्रक्चरला दिलेले प्राधान्य देशाला तिसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेकडे वेगाने घेऊन जाईल,” असेही त्यांनी स्पष्ट केले.एकूणच, केंद्रीय अर्थसंकल्प २०२६–२७ हा सामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावणारा आणि महाराष्ट्रासह देशाच्या दीर्घकालीन प्रगतीचा मजबूत पाया घालणारा असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.

> **“विकसित भारताचा अर्थसंकल्प” असे यंदाच्या अर्थसंकल्पाचे एका शब्दात वर्णन करता येईल. ग्रामीण भागाला बूस्टर, महानगरांना नियोजन देणारा, दीर्घकालीन विकासाला चालना आणि देशाचे आर्थिक स्थैर्य मजबूत करणारा हा अर्थसंकल्प आहे. महत्त्वाचे म्हणजे पुणे मुंबई हायस्पीड कॉरिडॉरच्या माध्यमातून पुणे जिल्ह्याची गुंतवणूक, औद्योगिक विकास, शैक्षणिक, दळणवळण आणि आरोग्य क्षेत्राचा ग्राफ उंचावणार आहे. एकंदरीतच देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या विकसित भारताच्या स्वप्नांकडे झेपावणारा हा अर्थसंकल्प आहे. ज्यामध्ये महाराष्ट्राचे कार्यक्षम मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नियोजनाचे प्रतिबिंब स्पष्टरित्या दिसत आहेत. अर्थसंकल्पातून देशातील सामान्य नागरिकांचा आर्थिक भार कमी होईल आणि आर्थिक स्थैर्य मजबूत बनेल, असा विश्वास आहे. महाराष्ट्रासहित विविध राज्यांना देखील बळकट आर्थिक महत्त्व देणारा हा पुढील 50 वर्षांच्या विकासाचे रोडमॅप दर्शविणारा अर्थसंकल्प आहे.**
>
> **- शंकर जगताप , आमदार,**
> **पिंपरी चिंचवड शहर**

# आत्मनिर्भर भारताच्या दिशेने निर्णायक पाऊल : आमदार महेश लांडगे

## अर्थसंकल्प मजबूत, आत्मनिर्भर आणि सुरक्षित भारताच्या दिशेने टाकलेले एक निर्णायक पाऊल आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

“जागतिक पातळीवर निर्माण झालेली अस्थिरता, शेजारी देशांमधील वाढता तणाव आणि आधुनिक युद्धपद्धतींचे बदलते स्वरूप लक्षात घेता केंद्र सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात संरक्षण क्षेत्रासाठी केलेली मोठी वाढ ही काळाची गरज आहे. ७.८ लाख कोटी रुपयांचे संरक्षण बजेट हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत सरकारची दूरदृष्टी आणि ठाम भूमिका दर्शवते.

संरक्षण दलांच्या आधुनिकीकरणासाठी २.१९ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. आजच्या काळात युद्ध केवळ सीमांवरच नाही तर सायबर स्पेस, ड्रोन तंत्रज्ञान आणि हायटेक शस्त्र प्रणालींच्या माध्यमातून लढले जात आहे. त्यामुळे ड्रोन, मिसाईल, फायटर जेट्स, एअर डिफेन्स सिस्टम आणि सायबर सुरक्षा यामध्ये गुंतवणूक करणे अत्यावश्यक झाले आहे.

‘मेक इन इंडिया’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ या धोरणांना संरक्षण क्षेत्रात अधिक बळ मिळणार असून स्वदेशी शस्त्रनिर्मिती, देशांतर्गत उत्पादन आणि संरक्षण निर्यात वाढीस यामुळे मोठी चालना मिळेल. २०२९ पर्यंत ५० हजार कोटी रुपयांच्या संरक्षण निर्यातीचे लक्ष्य हे भारताला जागतिक संरक्षण क्षेत्रातील एक मजबूत शक्ती बनवणारे ठरेल.

रशिया-युक्रेन युद्ध, मध्यपूर्वेतील संघर्ष, भारत-चीन सीमेवरील परिस्थिती, भारत-पाकिस्तान संबंध आणि बांगलादेशातील अस्थिरता या सर्व पार्श्वभूमीवर भारताने आपल्या लष्करी क्षमतेत वाढ करणे अपरिहार्य आहे. ऑपरेशन सिंदूरसारख्या घटनांमधून धडे घेत केंद्र सरकारने सुरक्षेच्या दृष्टीने योग्य आणि ठोस पावले उचलली आहेत.

राफेल एम फायटर जेट्स, प्रोजेक्ट ७५I अंतर्गत स्टेल्थ पाणबुड्या, आधुनिक UAV ड्रोन, तेजस विमान, प्रचंड हेलिकॉप्टर, ब्रह्मोस मिसाईल आणि S-400 एअर डिफेन्स सिस्टम यांसारखे प्रकल्प भारताच्या संरक्षण क्षमतेला नवे बळ देतील.

देशाच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणारा हा अर्थसंकल्प मांडल्याबद्दल पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामण यांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो. हा अर्थसंकल्प मजबूत, आत्मनिर्भर आणि सुरक्षित भारताच्या दिशेने टाकलेले एक निर्णायक पाऊल आहे.”

### पुणे परिसरात ग्रोथ हबसाठी 5000 हजार कोटी...

**» मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. प्रत्येक ग्रोथ हबसाठी 5000 कोटी प्रत्येकी 5 वर्षांत प्राप्त होणार आहेत, त्याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबसाठी होणार आहे. लखपती दिदींना व्याजमुक्त कर्ज देण्याबरोबरच शी मार्टस व प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी हॉस्टेल ही योजना सुरू केली जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या रुग्णालयात कॅज्युअल्टी आणि ट्रॉमा सेंटर तयार करण्यात येणार आहे. ज्यामुळे ग्रामीण आणि गरीब लोकांसाठी व्यवस्था तयार होईल.**

# महापालिकेत ‘खांदेपालटा’चा हायव्होल्टेज ड्रामा

## नवी महापालिका अस्तित्वात येण्यापूर्वीच आयुक्त पालिकेत मोठ्या प्रमाणावर खांदेपालट करण्याची शक्यता आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

नवी महापालिका अस्तित्वात येण्यापूर्वीच आयुक्त पालिकेत मोठ्या प्रमाणावर खांदेपालट करण्याची शक्यता आहे. त्यासाठी शुक्रवारी दिवसभर आयुक्तांनी बैठका घेतल्या. मात्र, अद्याप बदल्यांची यादी जाहीर केलेली नाही. प्रामुख्याने घनकचरा व्यवस्थापन, पथ, प्रकल्प विभागांसह परिमंडळ उपायुक्त आणि इतर काही महत्त्वाच्या खात्यांतील उपायुक्त बदलण्यात येणार असल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांनी दिली.

यामध्ये विशेषतः घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी तीन ते चार अधिकाऱ्यांनी आयुक्तांकडे तसेच राज्यातील नेत्यांकडे फिल्डिंग लावल्याची चर्चा आहे. त्यात, महापालिकेतील उपायुक्तांसह, शासनाकडून आलेल्या उपायुक्तांचाही समावेश आहे. दरम्यान, बदल्यांसाठी वरून दबाव येत असल्याने महापालिका आयुक्तही नाराज असल्याचे सांगण्यात येत आहे.

महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे ३० जानेवारीला सेवानिवृत्त झाले. त्यानंतर त्यांच्या पदाचा अतिरिक्त पदभार पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांच्याकडे दिला आहे. त्यामुळे आता पथ विभागाच्या प्रमुखपदी महापालिकेचा अधिकारी नियुक्त करावा लागणार आहे.

या पदासाठी पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप, प्रकल्प विभागाचे प्रमुख दिनकर गोजारे तसेच बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश बनकर यांची नावे चर्चेत आहेत. मात्र, जगताप, गोजारे यांना पथ विभाग दिल्यास त्यांच्या रिक्त होणाऱ्या पदांवर नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी लागणार आहे. सध्या महापालिकेत पालिका व शासनाकडील मिळून एकूण १८ उपायुक्तांची पदे पूर्णपणे भरलेली आहेत.

निवडणुकीचे कामकाज संपल्याने निवडणूक विभागाचे उपायुक्त प्रसाद काटकर यांच्याकडे सध्या कोणताही अन्य मोठा पदभार नाही. यापुर्वी निवडणुकीच्या काळात आयुक्तांकडून मिळकतकर, घनकचरा, वाहन विभाग, भवन रचना आदी विभागांचे प्रमुख बदलले होते. त्यामुळे अधिकाऱ्यांमध्ये नाराजी होती. मात्र, निवडणुकीनंतर फेरबदल करण्यात येतील, असे आश्वासन आयुक्तांकडून संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते.

त्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी आयुक्तांनी सामान्य प्रशासन विभाग तसेच अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांच्यासह नव्या बदल्यांबाबत बैठक घेतली. दीड ते दोन तास यावेळी बदल्यांवर चर्चा झाली. त्यानंतर रात्री बदल्यांचे आदेश काढले जातील, असे सांगण्यात येत होते.

मात्र, अद्याप प्रशासनाने हे आदेश काढलेले नाहीत. बदल्यांवरून अधिकारी पुन्हा नाराज झाल्याने तसेच आयुक्तांवर दबाव आणला जात असल्यानेच आदेश काढण्यात आले नसल्याचीही चर्चा प्रशासकीय वर्तुळात आहे.




### दीड ते दोन तास यावेळी बदल्यांवर चर्चा

» त्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी आयुक्तांनी सामान्य प्रशासन विभाग तसेच अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांच्यासह नव्या बदल्यांबाबत बैठक घेतली. दीड ते दोन तास यावेळी बदल्यांवर चर्चा झाली. त्यानंतर रात्री बदल्यांचे आदेश काढले जातील, असे सांगण्यात येत होते.मात्र, अद्याप प्रशासनाने हे आदेश काढलेले नाहीत. बदल्यांवरून अधिकारी पुन्हा नाराज झाल्याने तसेच आयुक्तांवर दबाव आणला जात असल्यानेच आदेश काढण्यात आले नसल्याचीही चर्चा प्रशासकीय वर्तुळात आहे.

### नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी लागणार

» महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे ३० जानेवारीला सेवानिवृत्त झाले. त्यानंतर त्यांच्या पदाचा अतिरिक्त पदभार पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांच्याकडे दिला आहे. त्यामुळे आता पथ विभागाच्या प्रमुखपदी महापालिकेचा अधिकारी नियुक्त करावा लागणार आहे. या पदासाठी पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप, प्रकल्प विभागाचे प्रमुख दिनकर गोजारे तसेच बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश बनकर यांची नावे चर्चेत आहेत. मात्र, जगताप, गोजारे यांना पथ विभाग दिल्यास त्यांच्या रिक्त होणाऱ्या पदांवर नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी लागणार आहे.सध्या महापालिकेत पालिका व शासनाकडील मिळून एकूण १८ उपायुक्तांची पदे पूर्णपणे भरलेली आहेत.

# अर्थमंत्री सीतारामन यांच्या भाषणात पुण्याचा उल्लेख किती वेळा अन् पुणेकरांना काय मिळालं...

## केंद्रीय अर्थसंकल्प रविवारी मांडला, अर्थमंत्र्यांच्या पूर्ण अर्थसंकल्पीय भाषणात पुण्याचा उल्लेख दोन वेळा करण्यात आला.

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आर्थिक वर्ष २०२६-२७ साठीचा केंद्रीय अर्थसंकल्प रविवारी मांडला. या अर्थसंकल्पात पुण्यासाठी विशेष घोषणा केली जाण्याची अपेक्षा होती. प्रत्यक्षात अर्थमंत्र्यांच्या पूर्ण अर्थसंकल्पीय भाषणात पुण्याचा उल्लेख केवळ दोन वेळा करण्यात आला. त्यातून पुणेकरांच्या हाती फार काही लागले नसल्याचेच चित्र आहे.

केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन यांनी सादर केलेला हा सलग नववा अर्थसंकल्प ठरला आहे. अर्थसंकल्पीय भाषण तब्बल ९५ मिनिटे म्हणजेच १ तास २५ मिनिटांचे होते. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पातील त्यांचे भाषण १ तास १७ मिनिटे होते. यंदाच्या भाषणात सीतारान यांनी पुण्याचा उल्लेख दोन वेळा केला. देशाचे रेल्वेचे जलद गती जाळे विस्तारित करण्याची घोषणा केली. त्यात ७ हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरची घोषणाही त्यांनी केली. त्यावेळी या कॉरिडॉरची नावे घेताना सीतारामन यांनी दोन वेळा पुण्याचा उल्लेख केला.

सीतारामन म्हणाल्या की, पर्यावरणदृष्ट्या शाश्वत सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी देशांतील महानगरांना जोडणारे सात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर विकसित केले जातील. हे कॉरिडॉर महानगरांना एकमेकांशी जोडून देशाची वाटचाल विकासाकडे अधिक वेगाने होण्यास मदत करतील. त्यात मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद, हैदराबाद ते बंगळुरु, हैदराबाद ते चेन्नई, चेन्नई ते बंगळुरु, दिल्ली ते वाराणसी आणि वाराणसी ते सिलीगुडी या सात रेल्वे कॉरिडॉरचा समावेश आहे.

देशाची उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढवणे, उद्योगांना चालना देणे तसेच जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. दुसरे कर्तव्य हे देशातील जनतेच्या आकांक्षा पूर्ण करणे. त्यासाठी नागरिकांचा कौशल्य विकास, क्षमतावृद्धी आणि रोजगारक्षमतेत वाढ करून त्यांना देशाच्या समृद्धीकडे वाटचाल करणाऱ्या विकासप्रक्रियेत सक्रियपणे सहभागी करून घेण्यात येणार आहे. तिसरे कर्तव्य म्हणजे, ‘सबका साथ, सबका विकास’ या तत्त्वावर आधारित सर्वसमावेशक विकास साध्य करणे. यामध्ये प्रत्येक कुटुंब, समाज आणि प्रदेशाला साधन-संपत्ती, मूलभूत सुविधा तसेच प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.




### सात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर

- » मुंबई ते पुणे
- » पुणे ते हैदराबाद
- » हैदराबाद ते बंगळुरू
- » हैदराबाद ते चेन्नई
- » चेन्नई ते बंगळुरू
- » दिल्ली ते वाराणसी
- » वाराणसी ते सिलीगुडी

# पुण्याच्या दळणवळण प्रकल्पांना निधीचा 'बुस्टर डोस' गरजेचा

## एक्सप्रेसवे कोंडी, बुलेट ट्रेन, मेट्रो आणि रेल्वे सुरक्षेसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात विशेष तरतुदीची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-मुंबई एक्सप्रेस-वेवरील वाहतूक कोंडी फोडण्यासह बुलेट ट्रेनच्या पूर्तता आणि पुण्याच्या दळणवळण व्यवस्थेला वेग मिळण्यासाठी निधीच्या 'बुस्टर डोस'ची गरज आहे. त्याअनुषंगाने पुण्यासाठी केंद्र सरकारने आगामी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करावी, अशी मागणी मध्य रेल्वेच्या प्रादेशिक सल्लागार समितीचे सदस्य आनंद सप्तर्षी यांनी केली. तसेच, केंद्रीय अर्थसंकल्पात पुण्याची मेट्रो, बुलेट ट्रेन आणि रेल्वे सुरक्षेसाठी विशेष तरतूद करण्याची मागणीही त्यांनी केली.

पुणे-मुंबई एक्सप्रेसवेवर वेगाचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंड आकारणे योग्यच आहे, मात्र सलग सुट्यांच्या काळात होणारी प्रचंड वाहतूक कोंडी हा चिंतेचा विषय बनला आहे. असेही सप्तर्षी यांनी या वेळी सांगितले. सुट्यांच्या काळात अनेक गाड्या येथील घाटात बंद पडतात आणि तासनतास ट्रॅफिक जाम होतो. अनेकदा अपघात होतात. या वेळी प्रशासकीय यंत्रणा अपुरी पडत असल्याने तत्काळ उपाययोजना करण्याची गरज आहे, या योजनांसाठी अर्थसंकल्पात भरीत तरतूद व्हावी, अशी मागणी सप्तर्षी यांनी केली.

रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी स्लीपर वंदे भारत गाड्यांची संख्या वाढवावी, पुण्यालाही स्लीपर वंदे भारत उपलब्ध करून द्याव्यात; जेणेकरून लांब पल्ल्याचा प्रवास अधिक सुखकर होईल, अशी मागणी त्यांनी केली. मात्र, प्रवासाच्या वेगासोबतच प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे, त्यासाठी आर्थिक तरतुदीची मागणी त्यांनी केली. ते म्हणाले, सध्या रेल्वे सुरक्षा बलाची (आरपीएफ) संख्या कमी असल्याने रेल्वेतील गुन्हेगारी वाढत आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी तातडीने सुरक्षा बल वाढविणे गरजेचे आहे. तसेच, नवीन गाड्या सुरू झाल्या तर युवकांना रोजगाराच्या संधी मिळतील. त्यासाठी रेल्वेने मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया राबवावी, अशी आग्राही मागणीही सप्तर्षी यांनी के ली. पुण्यात बुलेट ट्रेनचे स्वप्न लवकर साकार व्हावे आणि रेल्वे सुरक्षा अधिक भक्कम व्हावी, यासाठी अर्थसंकल्पात पुण्यासाठी विशेष पॅकेज मिळावे, अशी अपेक्षा मध्य रेल्वेच्या प्रादेशिक सल्लागार समितीचे सदस्य आनंद सप्तर्षी यांनी व्यक्त केली.

या रेल्वे स्थानकाच्या या मेकओव्हरकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. त्यामुळे येथील कामकाज आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार व्हावे, त्यासाठी केंद्राने भरीव निधी द्यावा, अशीही मागणी हर्षा शहा यांनी केली.



### पुणे स्टेशनच्या कायापालटासाठी हवी भरीव तरतूद

» पुणे रेल्वे स्थानकाचा विकास करताना फक्त आजचा विचार नको, तर आगामी 50 वर्षांतील बुलेट ट्रेन आणि हायपर लूपसारख्या तंत्रज्ञानाचा विचार करून भव्य डीपीआर तयार करावा अन् त्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात भरीव तरतूद व्हावी, अशी मागणी रेल्वे प्रवासी ग्रुपच्या अध्यक्षा हर्षा शहा यांनी केली.

### स्लीपर वंदे भारत अन् प्रवाशांची सुरक्षा

» रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी स्लीपर वंदे भारत गाड्यांची संख्या वाढवावी, पुण्यालाही स्लीपर वंदे भारत उपलब्ध करून द्याव्यात; जेणेकरून लांब पल्ल्याचा प्रवास अधिक सुखकर होईल, अशी मागणी त्यांनी केली. मात्र, प्रवासाच्या वेगासोबतच प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे, त्यासाठी आर्थिक तरतुदीची मागणी त्यांनी केली. ते म्हणाले, सध्या रेल्वे सुरक्षा बलाची (आरपीएफ) संख्या कमी असल्याने रेल्वेतील गुन्हेगारी वाढत आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी तातडीने सुरक्षा बल वाढविणे गरजेचे आहे. तसेच, नवीन गाड्या सुरू झाल्या तर युवकांना रोजगाराच्या संधी मिळतील. त्यासाठी रेल्वेने मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया राबवावी, अशी आग्राही मागणीही सप्तर्षी यांनी केली. पुण्यात बुलेट ट्रेनचे स्वप्न लवकर साकार व्हावे आणि रेल्वे सुरक्षा अधिक भक्कम व्हावी, यासाठी अर्थसंकल्पात पुण्यासाठी विशेष पॅकेज मिळावे, अशी अपेक्षा मध्य रेल्वेच्या प्रादेशिक सल्लागार समितीचे सदस्य आनंद सप्तर्षी यांनी व्यक्त केली.

# सर्वांच्या संमतीनेच राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा निर्णय : अमोल कोल्हे

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका झाल्यानंतर 17 फेब्रुवारीला विलीनीकरणाची अधिकृत घोषणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव उपमुख्यमंत्री कै. अजित पवार यांनी सहा-सात महिन्यांपूर्वीच मांडला होता. त्यानंतर दोन्ही गटांतील प्रमुख नेत्यांशी चर्चा करून सर्वांना विश्वासात घेण्यात आले. अखेर १७ जानेवारी रोजी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत विलीनीकरणासंदर्भात सविस्तर चर्चा झाली असून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका झाल्यानंतर १७ फेब्रुवारीला विलीनीकरणाची अधिकृत घोषणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी दिली.

डॉ. कोल्हे म्हणाले, अजित पवार यांनी मांडलेल्या विलीनीकरणाच्या प्रस्तावानंतर त्यांनी स्वतः आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी दोन्ही गटांतील नेत्यांशी संवाद साधला. त्यानंतर झालेल्या बैठकीत पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुका एकत्र लढवण्याचा निर्णय झाला. त्यानुसार जागावाटप करून निवडणुकादेखील एकत्रितपणे लढवण्यात आल्या. सध्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकाही बहुतांश ठिकाणी दोन्ही राष्ट्रवादी गट एकत्र लढवत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव उपमुख्यमंत्री कै. अजित पवार यांनी सहा-सात महिन्यांपूर्वीच मांडला होता. १७ जानेवारीला झालेल्या बैठकीत माझ्यासह जयंत पाटील, राजेश टोपे, हर्षवर्धन पाटील, शशिकांत शिंदे आणि रोहित पवार उपस्थित होते. या बैठकीत अजित पवार यांनी विलीनीकरणाबाबतची संपूर्ण माहिती शरद पवार यांना दिली. दोन्ही गटांतील नेत्यांची संमती असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावर शरद पवार यांनी सकारात्मक भूमिका दर्शवली. त्यामुळे निवडणुका पूर्ण झाल्यानंतर १७ फेब्रुवारीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची घोषणा करण्याचा निर्णय झाल्याचे डॉ. अमोल कोल्हे यांनी सांगितले.



### विलीनीकरणाची घोषणा करण्याचा निर्णय

» बारामती येथे १७ जानेवारीला झालेल्या बैठकीत माझ्यासह जयंत पाटील, राजेश टोपे, हर्षवर्धन पाटील, शशिकांत शिंदे आणि रोहित पवार उपस्थित होते. या बैठकीत अजित पवार यांनी विलीनीकरणाबाबतची संपूर्ण माहिती शरद पवार यांना दिली. दोन्ही गटांतील नेत्यांची संमती असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावर शरद पवार यांनी सकारात्मक भूमिका दर्शवली. त्यामुळे निवडणुका पूर्ण झाल्यानंतर १७ फेब्रुवारीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची घोषणा करण्याचा निर्णय झाल्याचे डॉ. अमोल कोल्हे यांनी सांगितले.